ISSN 2250-169X

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education For All Subjects

# VISION
## RESEARCH REVIEW



CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | Impact of GST on Industrial Sectors in Indian Economy<br>**Dr. Prashant S. Salve** | 1 |
| 2 | Inflation and Unemployment Rate in India in 2011-2018<br>**Dr. J. M. Kale** | 6 |
| 3 | Efficancy of Indian Banks to Fulfill Basel III Capital Adequacy Requirements<br>**Dr. Nilam Chhangani** | 13 |
| 4 | Problems of Pollution and the Solutions<br>**Dr. J. K. Waghmare** | 19 |
| 5 | Impact of Social Media on Indian Youth<br>**Laxman Jajodia, Kiran Nagare** | 26 |
| 6 | Mathematics in Nature : Fibonacci Sequence<br>**Dr. A. S. Patil** | 33 |
| 7 | महाराष्ट्र पर्यटन - आव्हाने आणि संधी<br>**उज्वला वाजपाई** | 44 |
| 8 | लोकशिक्षक श्री. संत गाडगे महाराज<br>**डॉ. खुवेरा नांदे** | 48 |
| 9 | भारतीय समाजातील काळा पैसा : एक अध्ययन<br>**डॉ. डि. के. कदम** | 56 |
| 10 | संत नामदेवांच्या अभंगाचे सवरुप<br>**डॉ. नविन के. गिलधिले** | 61 |

9

# भारतीय समाजातील काळा पैसा : एक अध्ययन

**डॉ. डि. के. कदम**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर, जि. नांदेड

## Research Paper - Sociology

**प्रस्तावना:**

भारत एकविसाव्या शतकात जागतिक महासत्तेच्या रूपाने उदयास येणारे राष्ट्र असले तरी आजही जगात एक विकसनशील देश म्हणून ओळखला जातो. भारतीय समाजात अनेक समस्या आजही आहेत त्या सर्व समस्या मध्ये काळ्या पैशाची एक प्रमुख समस्या आहे काळ्या पैशाची समस्या स्वतंर्त्यपूर्वी मर्यादित प्रमाणात होती; परंतु स्वातंर्त्यानंतर मात्र या समस्येत दिवशी दिवस मोठ्या प्रमाणात वाढ घडून आली आहे. आज काळ्या पैशाचे प्रमाण भारतीय समाजात इतके वाढले आहे की; काळा पैसा भ्रष्टाचाराच्या माध्यमातून निर्माण होत असतो. भ्रष्टाचार हा सर्वत्र पसरलेला आहे ग्रामपंचायत कार्यालयापासून ते राष्ट्रीय पातळीपर्यंत देशात भ्रष्टाचाराची प्रवृत्ती सर्वत्र दिसून येत आहे. स्वार्थी प्रवृत्ती व अभिलाषा यामुळे व्यक्ती भ्रष्टाचारी बनत चालला आहे. भ्रष्टाचारामुळे व्यक्तीचे नैतिक अंधपतन घडून येत आहे. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासात अडथळा निर्माण होत आहे. काळ्या पैशामुळे भारतीय समाजात नियोजन कारखाना योग्य उद्दिष्ट ठरवून ती साध्य करण्यासाठी अचूक अंदाज बांधता येत नाही. त्यामुळे यामुळे नियोजनाची उद्दिष्टे साध्य करण्यात काळ्या पैशाची समस्या निर्माण होते म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात भारतीय समाजातील काळा पैसा एक अध्ययन याचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

काळा पैसा म्हणजे ज्या पैशावर प्रत्यक्ष त्व अप्रत्यक्ष कर नसतो त्या पैशाला काळा पैसा असे संबोधले जाते. काळा पैसा म्हणजे अनाधिकृत मार्गाने मिळवलेली संपत्ती होय. भ्रष्टाचारी मार्गाने कमवलेली संपत्ती त्याला काही काळा पैसा म्हटले जाते. काळा पैसा म्हणजे अवैद्य मार्गाने निर्माण झालेला पैसा असे आपण सामान्य व्यवहारात म्हणतो तसेच काळ्या पैशास नंबर दोनचा पैसा असेही म्हणतात. काळा पैसा कमावणारी व्यक्ती कायद्याचे पालन करत नाहीत. ते कोणत्या ना कोणत्या

प्रकारे कायद्याचे उल्लंघन करून पैसा कमावतात त्यात भ्रष्टाचार, कर बुडवणूक, बेकायदा व्यापार इत्यादी मार्गाने मिळवले जाते. शासकीय कायद्याचे पालन न करता शासनाच्या मंजुरीविना गुप्त पद्धतीने केले जातात आणि त्यामधून शासनाच्या कराची चोरी केली जाते. यातून जो पैसा निर्माण होतो त्यास काळा पैसा असे म्हणतात. काळा पैसा हा उत्पन्न व चलनाशी संबंधित आहे तर काळी संपत्ती मालमत्तेची संपत्तीत आहे म्हणजेच अवैद्य मार्गातून निर्माण होणारा पैसा म्हणजे काळा पैसा होईल काळ्या पैशास अनेक पर्यायी नावाने संबोधले जाते हा पैसा प्रामुख्याने कर चोरी भ्रष्टाचार व बेकायदेशीर कामातून समाजात निर्माण होत असतो हे स्पष्ट दिसून येते.

**अध्ययनाची उद्दिष्टे :**

१) भारतीय समाजातील काळ्या पैशाचा अभ्यास करणे.

२) काळ्या पैशाच्या निर्मितीच्या कारणांचा अभ्यास करणे.

३) काळ्या पैशाच्या होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

**भारतातील काळा पैसा:**

| अभ्यास समित्या | वर्ष | अंदाज | G.D.P. |
|---|---|---|---|
| एन केल्डोर | १९५२—५३ | ६०० | ६ |
| के.एन. वांच्छू | १९५१—६२ | ७०० | ४.४ |
| डी.के.रांगणेकर | १९६९—७० | ३०८० | ८.४ |
| ओ. पी.चोपडा | १९७६—७७ | ८०६८ | १०.५ |
| एस.गुप्ता व पी.गुप्ता | १९७८—७९ | ३०६४ | ४८.८ |
| एस. बी.गुप्ता | १९८७—८८ | ५०९७७ | ५०.७ |
| केंद्रीय सांख्यिकी संघटन | २००९—१० | २५००००० | ३ |

**तथ्य संकलन:**

प्रतिशोध निबंधासाठी तथ्य संकलन करताना दुय्यम तथ्य सामग्रीचा अवलंब करण्यात आला आहे त्यात विविध ग्रंथ, विविध अहवाल, संकेतस्थळ वर्तमानपत्रे व मासिके यांचा आधार घेण्यात आला आहे.

स्त्रोतः १) रुद्र दत्त व सुंदरम भारतीय अर्थव्यवस्था ५५ वी आवृत्ती २००७.

२) C. S. C चा, २००९-१० वार्षिक अहवाल

वरील समितीच्या नुसार काळ्या पैशाची अंदाज विविध समितीकडून व्यक्त करण्यात आले आहेत.१९५२-५३ मध्ये एन कॅलिडोर यांनी सहाशे कोटी काळा पैसा असल्याचे मत व्यक्त केले होते. तेव्हा काळ्या पैशाची जीडीपी सी प्रमाण सहा टक्के इतके होते. तर १९८७-८८ पर्यंत त्यात वाढ होत जाऊन एस बी गुप्ता समितीच्या अंधानुसार ५०९७७ कोटी रुपये आले होते. काळ्या पैशाची

जीडीपीसी प्रमाण ५०.७% पर्यंत वाढले होते. यावरून हे स्पष्ट होते की दिवसेंदिवस काळ्या पैशात वाढ होऊन घडून येत दहापर्यंत केंद्रीय सांख्यिकी संघटन आयोगाच्या आकडेवारीनुसार देशात २५००००० कोटी रुपये काळा पैसा देशात निर्माण झाला मध्ये सीबीआयचे संचालक एपी सिंग यांनी असे मत व्यक्त केले आहे की ५०० बिलियन डॉलर भारतीयांनी काळा पैसा विदेशात ठेवलेला आहे ही बाब अतिशय गंभीर स्वरूपाची असल्याची दिसून येते.

भारतीय समाजात काळा पैसा निर्मित होण्याची अनेक कारणे आहेत त्यात भारतातील प्रचलित करण प्रणाली काळ्या पैशाच्या निर्मितीस जबरदस्त प्रमुख घटक आहे. वाढत्या उत्पन्नाबरोबरच कर मुक्तीची मर्यादा वाढविली पाहिजे परंतु ती स्थिर राहत असल्यामुळे कर चुकवेगिरीचे प्रमाण दिवसे दिवस वाढत गेल्याची दिसून येते डॉक्टर काबरा यांच्या मतानुसार कर चुकी केली टाळायचे असेल तर कराचे योग्य दर असायलाच पाहिजे परंतु हे कायदे जुने असल्याचे दिसून येते पण भारतातील नियंत्रणे परवाने वस्तूची वितरण प्रणाली सदोष असल्याचे असल्याचे काळे पैशात बेशुबी संपत्ती सातत्याने वाढ घडून येत आहे. प्रस्तुत शोधनिबंधात या कारणांचा आढावा घेण्यापेक्षा काळ्या पैशाच्या निर्मितीस राज्यशास्त्राच्या दृष्टिकोनातून समाजशास्त्री दृष्टिकोनातून अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून तीन कारणांचा आढावा घेतला आहे त्यात पहिल्या प्रथम आज भारतीय समाजातील राजकारण हे पैशावर चालले आहे असे सर्वसामान्य म्हटले जाते म्हणजेच सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता ही समीकरण आज भारतीय समाजात तयार झाले आहे. यामुळे राजकारण हे भ्रष्टाचारास फार मोठ्या प्रमाणात वाव देत आहे आज भारतीय राजकारणात राजकीय पदाच्या विजयासाठी कोट्यावधी रुपये खर्च केले जातात व या पैशाची वसुली राजकारणातून केली जाते म्हणजेच राजकारणातून सत्ता आणि सत्तेतून पैसा पैशातून राजकारण असेही समीकरण आहे म्हणून हे काळ्या पैशाला पोषक वातावरण असल्याचे दिसून येते. वार्ता भ्रष्टाचार ही भारतीय समाज व्यवस्थेतील काळ्या पैशाच्या निर्मितीचे एक महत्त्वाचे कारण मानले जाते भारतात आज भ्रष्टाचाराच्या घोटाळ्याची पेव फुटत आहे एका घोटाळ्यांनी अचिंबित व्हावे तर त्यापेक्षा मोठा घोटाळा उद्या उघडकीस आलेला पाहावयास मिळतो यातूनच काळ्या पैशाची निर्मिती मोठ्या प्रमाणात होताना दिसून येते. तर अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून आज स्थावर संपत्ती खरेदी विक्री करताना त्या संपत्तीचे वास्तविक मूल्य कमी दाखवून अशा व्यवहारात मुद्रांक शुल्क बुडविला जातो विक्रीकर जकात कर बुडविले जातात यातून काळ्या पैशाची निर्मिती होते. म्हणजेच शहरी भागात अवैध धंदे मोठ्या प्रमाणात चालतात. अवैद्यरित्या गल्लीबोळा त जुगार क्लब चालविले जातात यातून मोठ्या प्रमाणात काळ्या पैशाची उलाढाल होत असते लवकर श्रीमंत होण्यासाठी या अवैद्य मार्गांचा अवलंब करताना दिसून येतो त्याचबरोबर देशात सतत होणारी भाववाढ ही काळा पैसा निर्माण होण्याची प्रमुख कारण आहे वाढत्या महागाईमुळे व्यक्तीस आपल्या कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्याबरोबरच सैनीचे जीवन जगण्यात अनेक समस्या

निर्माण होतात म्हणून अशा व्यक्ती आपल्या पदाचा दुरुपयोग करून अवैद्य मार्गाकडे नकळत जातात आणि त्यातून काळ्या पैशाची निर्मिती होते हे स्पष्ट दिसून येते. समाजशास्त्री दृष्टिकोनातून काळ्या पैशाच्या निर्मिती मागे विचार केला तर आज भारतीय समाजातील नैतिक मूल्याची परवड होत चालली आहे आज समाजात योग्य काय अयोग्य काय वाईट काय चांगले काय इष्ट काय अनिष्ट काय याचा विचार न करता नता नीतिमतेचा विचार न करता अवैद्य मार्गाने पैसा मिळवून शैलीचे जीवन जगण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात या चैनीच्या जीवनप्रवृत्तीचा परिणाम व्यक्तीस अधिक भ्रष्टाचार करावयास प्रोत्साहित करीत असतो म्हणून समाजात काळ्या पैशाची निर्मिती होत असते.

काळ्या पैशाचे दुष्परिणाम भारतीय समाजावर होताना दिसून येतात सामाजिक न्यायासह आर्थिक वृद्धी हे भारतीय नियोजनाचे एक प्रमुख उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देशातील बचत गुंतवणूक व उत्पन्नपातळी यांचा योग्य अंदाज देशातील नियोजन कारकांना. काळ्या पैशाचे प्रमाण अधिक असल्यास नियोजन कराकांनी ठरविलेले उद्दिष्टे साध्य करण्यात अनेक अडचणी येतात काळ्या पैशाच्या साह्याने समाजाच्या दृष्टीने अवैद्य असणारी व्यवहार केले जातात या पैशाच्या साह्याने जमिनी इमारती सोने-चांदी, दाग दागिने इत्यादी अन उत्पादक बाबी खरेदी केल्या जातात तसेच चैनी जीवनावर चेन बाज जीवन मोठ्या प्रमाणावर खर्च केला जातो काळा पैसा अनाधिकृतपणे उद्योगात गुंतविला जात नाही त्यामुळे राष्ट्रीय सामग्रीचा दुर्मिळ होतो. सटेबाजीला चालना मिळ्ते काळा पैसा अधिक असणारे लोक बाजारात मोठ्या प्रमाणात देवाण-घेवाण करतात वस्तूच्या मालाचा साठा तयार करून कृत्रिम अन्नधान्य टंचाई निर्माण करतात. त्यामुळे खुल्या बाजारात त्यांचाही वाढवून महागाई वाढते शिवाय आपल्याकडील पैसा जमिनी इमारती सोने-चांदी हिरी अशा रियल इन्स्टिट्यूट आणि मूल्यवान वस्तूमध्ये गुंतवतात याचा परिणाम शहरी भागामध्ये जमिनी प्लॉट इमारतीच्या किमती गगनाला जाऊन पोहोचतात. आज काळा पैशा अतिशय वाईट परिणाम म्हणजे सामाजिक नीतिमूल्याचा ऱ्हास होत काळ्या पैशाने समाजातील नैतिक मूल्यांना सुरुंग लावला जातो अवैद्य व्यवहार करणारी अप्रमाणिक लोक थाटामाटा चैन बाजीचे जीवन जगतात तर इमानदार कष्ट करणाऱ्या प्रामाणिक लोकांना जीवनावश्यक गरजांची पूर्तता ही करणे कठीण होऊन बसते याचा विपरीत परिणाम समाजाच्या प्रामाणिक लोकांच्या मानसिकतेवर होते आपण चांगले वागून काय उपयोग आहे जो अवैद्य मार्गाने वागतो भ्रष्टाचार करतो तो चाचणी जीवन जगतो म्हणून दिवसेंदिवस हे सामाजिक नैतिक मूल्याचा ?हास होताना दिसून येतो. त्यामुळेच समाजामध्ये आर्थिक विषमतेत वाढ घडून येते कारण काळ्या पैशामुळे श्रीमंत लोक दिवसेंदिवस श्रीमंत होत आहेत तर गरीब अधिक गरीबच होतो यामुळे दारिर्द्य बेकारीच्या प्रमाणात वाढ घडून येते म्हणून हा एक अतिशय वाईट परिणाम म्हणजेच आर्थिक विषमतेत अधिक वाढ घडून येतो. वाईट परिणाम काळ्या पैशाची भारतीय

समाजाला भोगावे लागतात पण प्रस्तुत शोधनिबंधात काही प्रमुख परिणामांचा आढावा घेण्यात आला आहे.

काळ्या पैशाला आळा घालण्यासाठी वेकायदेशीर कर बुडविणारे यांना कठोर शिक्षा करण्यासाठी कठोर कायदे करण्याची गरज आहे. ज्या लोकांकडे मोठ्या प्रमाणात काळा पैसा आहे ते लोक शिक्षेपासून वाचून अधिकाऱ्यांना लाच देण्यासाठी वापरतात म्हणून आज कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी झाली पाहिजे ;कायद्यातील तुरटी दूर करून नवीन अतिशय कठोर कायदे बनविणे गरजेचे आहे, नुसते कायदे बनवून नाही तर त्या कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे.

काळ्या पैशाच्या निर्मितीच्या विरोधात कठोर अशी कायदेशीर कार्यवाही केली पाहिजे याचबरोबर समाजात नैतिक मूल्याची योग्य रुजणूक झाली पाहिजे .त्यातून आपण काळा पैसा मुक्त देशाची स्वप्न पाहू शकतो.अन्यथा आपल्या स्वप्नांना काहीच अर्थ उरणार नाही.समाजात योग्य नैतिक मूल्याची रुजवणूक करून आपण देशाला;समाजाला भ्रष्टाचार मुक्त करू शकतो .जोपर्यंत समाजाची मानसिकता काळ्या पैशाच्या विरोधात तयार होत नाही.तोपर्यंत कितीही कायदेशीर मार्गाचा अवलंब केला तरी ही समस्या सुटणार नाही. महात्मा गांधींनी एका ठिकाणी म्हटली होती की ;निसर्गाने विश्वात इतके काही निर्माण केले आहे की ;संपूर्ण मानव जात सुका समाधानी जीवन जगू शकते परंतु मानवी हव्यासामुळे ते शक्य होत नाही यामुळे एकाच्या हव्यासाच्या दुस?यावर परिणाम घडून येतो म्हणून विश्वात मानव जात सुखाने समाधान यांनी नांदत नाही म्हणून आपल्याला आपल्या गरजा मर्यादित ठेवून समाधानी जीवन जगण्यास शिकले पाहिजे.

## संदर्भ सूची :-

१) यादव एस. एस. काळा पैसा व नवे आर्थिक धोरण; लोकसत्ता सप्टेंबर २००९.
२) एम.एल.झिंगन समस्ती अर्थशास्त्र वृंदा पब्लिकेशन नवी दिल्ली.
३) भारतीय अर्थव्यवस्था; वार्षिक अंक (२०१० )साहित्य भवन पब्लिकेशन पुणे .
४) लांवा अनिल;काळा पैसा;ले ख दैनिक सकाळ २ जानेवारी २०११.
५) के.पी. सुंदरम व रूद्रदत- भारतीय अर्थव्यवस्था , एस. चांद अँड कंपनी लि.नवी दिल्ली,